**ठळक बातम्या**

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या सत्राची सांगता, वक्फ दुरुस्ती विधेयकावरील संयुक्त समितीचा अहवाल सादर
- आयकर कायदा सोपा करणारं नवीन आयकर विधेयक लोकसभेत सादर
- मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू
- माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती

**आणि**

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राची पदकांच्या द्विशतकाकडे वाटचाल

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा संपल्यामुळे संसदेची दोन्ही सभागृह आज येत्या १० मार्च पर्यंत स्थगित करण्यात आली. गेल्या महिन्यात ३१ जानेवारी रोजी अधिवेशनाचा पहिला टप्पा सुरू झाला होता. अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात ११२ टक्के उत्पादकता नोंदवली गेल्याचं लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सांगितलं. राष्ट्रपतींनी संसदेच्या संयुक्त अधिवेशनाला दिलेल्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेत १७७ सदस्यांनी १७ तासांहून अधिक काळ भाग घेतला, तर २०२५-२६ च्या सर्वसाधारण अर्थसंकल्पावरच्या चर्चेत १७० सदस्यांनी भाग घेतल्याचं त्यांनी सांगितलं.

वक्फ (दुरुस्ती) विधेयक 2024 बाबतच्या संयुक्त समितीचा अहवाल आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांच्या गदारोळात सादर करण्यात आला. समितीचे अध्यक्ष जगदंबिका पाल यांनी हा अहवाल लोकसभेत मांडला. त्यानंतर विरोधी पक्ष सदस्यांनी गोंधळ घातला. विरोधी पक्ष सदस्यांच्या मागणीनुसार लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी अहवालात असहमतीच्या सूचना जोडण्याची परवानगी दिली, तर त्याला भाजपाची कोणतीही हरकत नसल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले. त्यानंतर काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्ष, टीएमसी आणि इतर विरोधी पक्ष सदस्यांनी अहवाला विरोधात निषेध नोंदवत सभात्याग केला.

राज्यसभेत आज सकाळी कामकाज सुरु झाल्यावर भाजपा खासदार डॉ. मेधा कुलकर्णी यांनी अहवालाची प्रत सभागृहात मांडली. त्यानंतर  विरोधी पक्ष सदस्यांनी गोंधळ घातला. राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी त्यांना कारवाईचा इशारा दिला. अहवालामधून असहमती अथवा सूचनांचा कोणताही भाग वगळण्यात आला नसल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी स्पष्ट केल्याचं ते म्हणाले.

तहकुबीनंतर सभागृहाचं कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर, समितीच्या बैठकीत विरोधी सदस्यांनी दिलेल्या असहमतीच्या नोंदी अहवालात समाविष्ट केल्या नसल्याचा आरोप विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केला. हे लोकशाही विरोधी पाऊल असल्याचा आरोप त्यांनी केला, आणि अहवालात मतभेद समाविष्ट नसतील तर तो समितीकडे परत पाठवावा, असं ते म्हणाले.

त्याला उत्तर देताना, विरोधकांनी या मुद्द्यावरून सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केला. अहवालाचा कोणताही भाग, कार्यवाही अथवा असहमती सूचना हटवण्यात आल्या नसल्याचं  ते म्हणाले.

<><><><><>

सामान्य नागरिकांना महागाईचा फटका बसणार नाही, यासाठी विविध उपाय योजणं सरकार सुरू ठेवेल, अशी ग्वाही केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली. राज्यसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना त्या बोलत होत्या. ग्राहक किंमत निर्देशाकांवर आधारित चलनवाढीचा निर्देशांक गेल्या महिन्यातल्या ५ पूर्णांक २२ दशांश टक्क्यांवरुन ४ पूर्णांक ३१ दशांश टक्क्यांवर आल्याचं त्या म्हणाल्या.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५-२६, हा  सर्वसमावेशक विकास सुनिश्चित करणारा आणि खासगी क्षेत्राची गुंतवणूक आकर्षित करणारा ठरेल. यंदाचा अर्थसंकल्प हा अंदाजांपलीकडच्या गंभीर आव्हानात्मक परिस्थितीत  तयार करण्यात आल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

आयकरातल्या सवलतींचा फायदा केवळ श्रीमंतांना होईल, हा विरोधकांचा आरोप त्यांनी फेटाळून लावला. मध्यमवर्गालाही या सवलतींचा लाभ होईल, याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

<><><><><>

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज नवीन आयकर विधेयक लोकसभेत मांडलं. विद्यमान आयकर कायदा सोपा आणि सुटसुटीत करण्यासाठी हे नवीन विधेयक सरकारनं सादर केलं आहे. हे विधेयक संसदीय

स्थायी समितीकडे पाठवण्याची शिफारस सीतारामन यांनी केली. आगामी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी समितीनं अहवाल सादर करावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**होल्ड....**

नव्या आयकर विधेयकात धोरणात्तम बदल किंवा करांच्या दरामध्ये मोठ्या प्रमाणात बदल नाहीत. महत्त्वाचं म्हणजे यातून मागील वर्ष, assessment year हे उल्लेख काढून टाकले आहेत. वेतनाच्या संदर्भातल्या सर्व तरतुदी एकाच ठिकाणी घेतलेल्या आहेत. ग्रॅच्युईटी, कपात, निवृत्तीवेतन वगैरेंचा समावेशही वेतनासोबतच आहे. या विधेयकात जुन्या कायद्याच्या तुलनेत २३ परिच्छेद आणि २८३ कलमं कमी आहेत. कायदा लोकांना अधिक सोप्या पद्धतीनं समजावा यासाठी आधीच्या तुलनेत जास्त तक्ते आणि समीकरणं आहेत. TDS/TCS सुलभ होण्यासाठी यासंदर्भातल्या तरतुदी तक्त्यांच्या स्वरुपात दिल्या आहेत. शिवाय स्वयंसेवी संस्थांसाठीच्या तरतुदी सोप्या भाषेत लिहिल्या आहेत. विधेयक तयार करताना सरकारला २१ हजार सूचना प्राप्त झाल्या. त्यातल्या योग्य सूचनांचा समावेश केल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या.

**<><><><><>**

सरकार येत्या काही दिवसात विविध राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना एकाच छत्राखाली आणण्याचा प्रयत्न करत आहे. कामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी आज राज्यसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात ही माहिती दिली. असंघटीत कामगारांच्या निवृत्ती वेतनासाठी सध्या अटल पेन्शन योजना, पीएम श्रमिक मंथन आणि पीएम श्रमयोगी मंथन अशा विविध योजना सुरु आहेत. देशातील ६ कोटी लोक या योजनांचा लाभ घेत आहेत. असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना हटवण्याचा अधिकार केवळ संसदेकडे असल्याचं प्रतिपादन राज्यसभेचे अध्यक्ष जगदिप धनखड यांनी आज

सभागृहात केलं. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश शेखर यादव यांना पदावरून हटवण्याची नोटीस प्रलंबित असल्याचं धनखड यांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्र सरकारनं मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू केली आहे. मुख्यमंत्री एन. बिरेन सिंग यांनी गेल्याच आठवड्यात राजीनामा दिला होता. त्यानंतर आज राष्ट्रपती राजवट लागू करण्याची अधिसूचना केंद्रीय गृहमंत्रालयानं जारी केली. विधानसभा सभागृह निलंबित केल्याचंही या अधिसूचनेत म्हटलं आहे.

<><><><><>

माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांची काँग्रेसच्या प्रदेशाध्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी आज प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. तर विजय वडेट्टीवार यांची काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

<><><><><>

पश्चिम बंगाल पोलिसांनी ऑपरेशन सायबर शक्ती अंतर्गत गेल्या पंधरा दिवसात ४६ सायबर गुन्हेगारांना अटक केली आहे. हे गुन्हेगार झारखंडच्या कुख्यात जमतारा टोळीशी संबंधित आहेत, अशी माहिती अतिरिक्त पोलीस महासंचालक सुप्रतीम सरकार यांनी दिली. पश्चिम बंगालच्या पश्चिमेकडच्या जिल्ह्यातून २५० हून अधिक तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्या तक्रारींवरून ही कारवाई करण्यात आली. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून ८४ मोबाईल फोन, ८४ सिम कार्ड्स, २ लॅपटॉप, १०० हून

अधिक डेबिट आणि क्रेडिट कार्ड्स, फसवी बँक खाती आणि इतर तांत्रिक उपकरणं जप्त करण्यात आली आहे.

<><><><><>

चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची एनईएफटी आणि आरटीजीएस ऑनलाइन प्रणाली हॅक करून सायबर चोरट्यांनी ३ कोटी ७० लाख ६४ हजार ७४२ रुपये लंपास केले आहेत. पोलिसांनी यावर तातडीनं कारवाई करत बँकेला आतापर्यंत १ कोटी ३२ लाख रुपये परत मिळवून दिले.  सर्व रक्कम हरियाणा इथं बँक खात्यावर वळती झाल्याचं तपासात समोर आलं आहे.

<><><><><>

रेडिओ हा माहिती, शिक्षण आणि मनोरंजनाचा विश्वासू स्रोत असल्याचं माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यांनी म्हटलं आहे. ते आज जागतिक रेडिओ दिनानिमित्त नवी दिल्लीत आयोजित केलेल्या रेडिओ महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी बोल होते. आकाशवाणी ही जगातली सर्वात मोठी प्रसारण संस्था असून ही देशाच्या ९८ टक्के लोकांपर्यंत पोहचत आहे. आकाशवाणीने सर्वसामान्य श्रोत्यांमध्ये हवामान बदलाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचं आकाशवाणीच्या महासंचालक डॉ. प्रज्ञा पालीवाल यांनी यावेळी सांगितलं. लोकांचा आकाशवाणीच्या बातम्या आणि कार्यक्रमातल्या माहितीवर विश्वास आहे असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आमदार राजन साळवी यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ

शिंदे यांच्या उपस्थित होते. ज्या पक्षातून राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली, त्या पक्षाला सोडून जाताना दुःख होत असल्याचं मनोगत यावेळी राजन साळवी यांनी व्यक्त केलं. दरम्यान, पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं रत्नागिरी जिल्हा समन्वयक रवी डोळस यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे.

**<><><><><>**

उत्तराखंड इथे सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राची पदकांच्या द्विशतकाकडे वाटचाल सुरू आहे. महाराष्ट्राच्या खात्यात सध्या सर्वाधिक १९६ पदकं आहेत. त्यात ५४ सुवर्ण, ७० रौप्य आणि ७२ कास्य पदकांचा समावेश आहे.

**//<><><><><>//**